## - सर्वसामान्य नियम -

१) कोणत्याही तारखेपासून सभासद होता येईल. वर्गणी संपूर्ण महिन्याची घेतली जाईल.

२) वर्गणी दरमहा आगाऊ १० तारखेचे आत दिली पाहिजे.

३) पुस्तके नेल्यापासून १५ दिवसात पुस्तक परत केले पाहिजे. पुन्हा तेच पुस्तक हवे असल्यास Re-Issue करुन घ्यावे. मात्र पुन्हा नोंद न केल्यास व असे पुस्तक १५ दिवसानंतर परत आल्यास पुढील प्रत्येक दिवसाला एक रुपया विलंब शुल्क न दिल्यास पुढील पुस्तक मिळू शकणार नाही.

४) अंक विभागाच्या सभासदांना आपल्या खात्यावर एक अंक मिळू शकेल. ८ दिवस अंक ठेवता येईल. पुढील प्रत्येक दिवसाला एक रुपया विलंब शुल्क द्यावे लागेल.

५) पुस्तक, मासिक किंवा वर्तमानपत्र अगर कोणतेही वाचन साहित्य हरविल्यास अगर खराब केल्यास त्याची इतर सर्व खर्चासह किंमत भरुन द्यावी लागेल.

६) दररोज फक्त एकदाच पुस्तक किंवा अंक बदलता येईल.

७) एखाद्या पुस्तकाला जास्त मागणी असल्यास, ग्रंथालयाने त्या पुस्तकाकरिता (नंबर) क्लेम सुरु केला असल्यास व आपणास ते पुस्तक हवे असल्यास क्लेम द्यावा.आपला नंबर येताच आपणास पुस्तक उपलब्ध होऊ शकेल

८) तीन महिन्यापेक्षा जास्त वर्गणी येणे राहिल्यास पूर्वसूचना न देता पुस्तक देणे बंद करण्यात येईल.

९) आपल्या खात्यावर दुसऱ्या इसमास पुस्तक देण्याचे असेल तर सभासदाने लेखी चिठ्ठीद्वारे कळविले पाहिजे.

१०) खाते बंद करताना अनामत रक्कम परत देण्यात येईल. मात्र महिना अखेरीस अंक, पुस्तके वगैरे जमा केलेली पाहिजे. नवीन महिन्याच्या ५ तारखेनंतर पुस्तके परत केल्यास आणि या तारखेनंतर खाते बंद करण्याचे असल्यास त्या चालू महिन्याची वर्गणी द्यावी लागेल. खाते बंद करण्याचा अर्ज अनामत भरल्याच्या पावतीसह द्यावा.

११) कोश, संदर्भ या इंग्रजी/मराठी यादीतील कोणताही ग्रंथ खात्यावर मिळणार नाही. मात्र तो सभासदांना ग्रंथालयात पाहता येईल.

१२) खात्यावर असलेली पुस्तके, वर्गणी जमा करुन खाते ३ महिन्यापर्यंत स्थगित ठेवता येईल. स्थगित ठेवलेल्या कालावधीत वर्गणी आकारली जाणार नाही व तीन महिन्यांनंतर खाते चालू न केल्यास न कळविता खाते बंद करण्यात येईल.

१३) प्रत्येक खात्यावर एकच दिवाळी अंक दिला जाईल. अंक नेल्यापासून तो तीन दिवस ठेवता येईल व चौथ्या दिवशी अंक परत करावा लागेल. अंक चौथ्या दिवशी परत न केल्यास पुढील प्रत्येक दिवसाला एक रुपया विलंब शुल्क द्यावे लागेल.

१४) अर्जात दिलेला पत्ता बदलल्यास ताबडतोब कळवावे.

१५) वर्गणी दिल्याची पावती घ्यावी. पावती राखून ठेवावी.

१६) बालविभागाच्या सभासदांसाठी पालकांच्या संमतीची जरुरी आहे.

१७) खालील दिलेल्या कोष्टकाप्रमाणे पुस्तके मिळतील.

१८) पुस्तक देवघेव पद्धतीची सुरुवातीलाच माहिती करुन घ्यावी.

१९) काही माहिती हवी असल्यास दिली जाईल. माहितीसाठी ग्रंथालयीन वेळात ग्रंथपाल किंवा कार्यवाह यांना भेटावे. सूचना करावयाची झाल्यास ती लेखी करावी.

२०) आपला पत्ता बरोबर असल्याबाबत या अर्जासोबत रेशनकार्ड, घराची पावती अगर अन्य दस्तऐवजाची झेरॉक्स प्रत सोबत जोडावी लागेल.

**वरील नियम मला मान्य आहेत.** **स्वाक्षरी**

**अनामत, मासिक वर्गणी आणि पुस्तके मिळण्याचे प्रमाण**

| वर्ग | प्रवेश शुल्क | मासिक वर्गणी | अनामत | एकावेळी पुस्तके | मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १ ला | १००.०० | ४५०.०० | १०००.०० | ६ | ४५ दिवस |
| २ रा | १००.०० | ३५०.०० | ७००.०० | ५ | ४० दिवस |
| ३ रा | १००.०० | २७५.०० | ५००.०० | ४ | ३० दिवस |
| ४ था | १००.०० | २००.०० | ५००.०० | २ | १५ दिवस |
| ५ वा | १००.०० | १५०.०० | ५००.०० | १ | १५ दिवस |
| बालविभाग सभासद | १००.०० | १००.०० | १००.०० | २ | ३० दिवस |
| अंक विभाग | १००.०० | ७५.०० | ३००.०० | १ अंक | ८ दिवस |

**टीप - सदर फॉर्म सभासदाने समक्ष येवून भरावयाचा आहे.**